आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र.४६

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – दत्तात्रय रामभाऊ मोरे

वय – ४९ वर्षे, व्यवसाय – शेती,

राहणार–वडझीरे, ता.पारनेर.

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत–**

आरोपीस मी तो सेंट्रल बँक ऑफ इंडीयामध्ये कामास असल्याने ओळखतो. आरोपी त्यावेळेस पाडळीदर्यात राहत होता. माझे सेंट्रल बॅक ऑफ इंडीया शाखा वडझीरे येथे सेव्हींग्ज खाते क्र.३१४१६७३९९५ होते. माझी पत्नी रंजना दत्तात्रय मोरे हिचेही त्या बँकेत सेव्हींग्ज खाते क्र.३१७१४९३३१७ असे आहे. गौतम जाधव हे बँकेत बँक मित्र म्हणुन होते. दि.९/३/२०२० रोजी मी व माझी पत्नी सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे येथे डिपॉझीट पावती करण्यासाठी गेलो. तेथे गेल्यानंतर आरोपीने आमची एफडीच्या फॉर्मवरती व चेकवरती सहया घेतल्या. बँकेच्या लाल रंगाच्या स्लीपवरही माझी सही घेतली. त्यादिवशी मी व माझी पत्नी घरी गेलो. त्यानंतर दि.२०/३/२०२१ रोजी मी व माझी पत्नी बँकेत एफडी डिपॉझीटची पावती घेण्यासाठी बँकेत आलो. ती पावती साडे तीन लाख रुपयाची माझ्या पत्नी रंजना दत्तात्रय मोरेच्या नावे होती. त्याच्या दोन दिवसानंतर मला आरोपीने एफडीची पावती दिली. ती पावती आम्ही घरी नेवुन ठेवली. ती पावती एक वर्षासाठी होती. तिची मुदत संपण्यापुर्वी आम्ही बँकेत आलो असता तेथील अधिकारी विद्या मॅडम यांनी सांगितले की तुमच्याकडील पावती डुप्लीकेट आहे व तुमच्या पावतीची नोंद अभिलेखात दिसत नाही. आमची फसवणुक झाली. आमचा त्यानंतर जबाब घेतला. त्यानंतर मी बँकेत पुन्हा गेलो नाही. मला जबाबासाठी दि.२७/३/२०२१ रोजी बोलावले होते. बँकेकडुन मला कळाले की माझी गौतम जाधव याने फसवणुक केली. आता मला दि.२३/३/२०२० ते दि.२३/३/२०२१ रोजीची माझी पत्नी रंजना दत्तात्रय मोरेच्या नावाची एफडीची पावती दाखवण्यात आली. ती पावती साडे तीन लाख रुपयाची असुन ती तीच आहे. तीच पावती मला गौतम जाधवने दिली होती.

त्यास **नि.४७** देण्यात येते. माझ्या नावावर ज्या लाल रंगाच्या पावतीवर आरोपीने माझी सही घेतली ती पावती रक्कम रुपये दोन लाखाबाबत असुन त्याची स्कॅन केलेली पावती दोषारोपपत्रातील कागदपत्रांमध्ये दाखल असुन ती मला दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यास ओळखीसाठी **नि.४८** देण्यात येते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.एल.ठाणगे यांच्यामार्फतः**

मी माझा जबाब पोलीसांना देतेवेळी वाचुन बघीतला होता. हे म्हणणे खरे आहे की गौतमजाधव यास मी फक्त बँक मित्र म्हणुन ओळखतो. माझा खाते क्र.३१४१६७३९९५ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की दि.९/३/२०२० रोजी मला कांद्याची आलेली रक्कम रुपये साडे तीन लाख भरण्यासाठी गेलो होतो. त्या कांद्याची पट्टी मी आज रोजी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळी मी बँकेत पैसे जमा करण्याकरीता गेलो त्यावेळी बँकेत सर्व स्टाफ हजर होता. हे म्हणणे खरे नाही की गौतम जाधवकडे जाण्या अगोदर मी बँकेचे शाखाधिकारी यांचेकडे जावुन आलो होतो.

प्रश्न– गौतम जाधवने तुमच्या सहया कोणत्या कागदपत्रांवर घेतल्या?

उत्तर– एफडीचा फॉर्म आणि एका लाल स्लीपवर सहया घेतल्या.

पोलीसांना जबाब देतेवेळी लाल स्लीपचा उल्लेख मी केला होता.

प्रश्न– तुमच्या पोलीसांसमोरील जबाबात लाल स्लीपचा उल्लेख नाही याचे कारण सांगता येईल का?

उत्तर– पोलीसांकडुन ते नजरचुकीने राहीले असेल.

हे म्हणणे खरे आहे की दि.९/३/२०२० रोजी मी बँकेत गेलो होतो व त्याच्या दोन दिवसानंतरही मी बँकेत गेलो होतो.

प्रश्न– तुम्हाला साडे तीन लाख रुपये रक्कम कटल्याचा मेसेज कधी व कोणत्या मोबाईलवर आला?

उत्तर– दि.९/३/२०२० रोजी मला माझ्या मोबाईल क्र.९४०५५७४३३५ वर मेसेज आला होता.

प्रश्न– पैसे कट झाल्याचा मेसेज आल्यानंतर तुम्ही तक्रार केली होती का?

उत्तर– तक्रार करण्याचे कारण नाही कारण पावती मला दिली होती.

साडे तीन लाख रुपयाची पावती माझ्या पत्नीची होती. त्या पावतीचा नंबर मला सांगता येणार नाही. नि.४७ वरील पावती माझ्या पत्नीची आहे. हे म्हणणे खरे आहे की या पावती अगोदर सुध्दा मी साडे तीन लाख रुपयाची पावती केली होती व ती पावती देखील मी गौतम जाधवकडे केली होती व त्या पावतीचे पैसे मला मिळाले होते.

हे म्हणणे खरे आहे की नि.४७ वरील पावतीवर नेमके सहया कोणी केल्या आहेत हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की सेंट्रल बँकेत माझे खाते असल्याने माझे तेथे कायम येणे जाणे असते. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे माझे प्रकाश बोरुडे व विद्या बोरुडे यांच्याशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की माझे जे पैसे गेले होते व ज्याबाबत मी आज साक्ष देत आहे ते पैसे मला बँकेकडुन मिळाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की सेंट्रल बँकेबाबत वडझीरे येथे मोठे आंदोलन झाले होते. हे म्हणणे खरे आहे की बँकेच्या कर्मचा–याने ज्या लोकांचे पैसे गुतविलेले आहेत ते पैसे त्या लोकांना परत मिळणार आहे अशी बातमी पेपरला आली होती व त्यानंतरच ते पैसे मला भेटले होते. हे म्हणणे खरे आहे की बँकेत जावुन जी मी पावती केली होती त्याचे पैसे मला एक वर्षानंतर मिळाले होते. हे म्हणणे खरे आहे की पैसे मिळाल्यानंतर मी पोलीसांसमोर हा जबाब दिला होता. हे म्हणणे खरे आहे की बँकेच्या वरिष्ठ अधिका–यांशी मी भेटलो तेव्हा त्यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी जे सांगितले त्याप्रमाणे मी पोलीसांसमोर जबाब दिला. हे म्हणणे खरे नाही की ज्या पावतीचे पैसे मला भेटले त्यानंतर बँकेकडुन अजुन पैसे मला मिळावेत यासाठी मी खोटा जबाब दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की गौतम जाधव याने कोणताही अपहार केला नसल्याने केवळ बँकेच्या वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी आज आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला असे आरोपीतर्फे वकीलांनी कळवल्यानंतर पुन्हा आरोपीतर्फे वकीलांनी सदर साक्षीदारास सरतपासामध्ये सांगितलेल्या गोष्टींबाबत उत्तरसुचक प्रश्न विचारण्याचे आहेत असे कोर्टास कळवले असता त्यास सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनीआक्षेप घेतला की साक्षीदार गेल्यानंतर पुन्हा त्या साक्षीदारास बोलावण्यात आले. सदर साक्षीदाराचा उलटतपास झाल्याचे

कळवल्यानंतर लगेच आरोपीतर्फे वकीलांनी सरतपासातील सांगितलेल्या गोष्टींबाबत प्रश्न विचारण्याचे राहुन गेले असे कळवले. साक्षीदार न्यायालयीन आवारातच असल्याने व केसमधील आरोपी न्यायालयीन बंदी असल्याने पुन्हा त्याच गोष्टीसाठी वेळ लागु नये त्यामुळे आरोपीतर्फे वकीलांना प्रश्न विचारण्याची संधी देण्यात येत आहे. यास सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनाही फेरतपास घेण्याची संधी राहील.

हे म्हणणे खरे आहे की मला माझे पैसे भेटल्याने आरोपीविरुध्द माझी तक्रार राहीली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील सांगितलेल्या गोष्टी खोटया आहेत.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(एन.एस.सबनीस)

दिनांकः १९/०८/२०२४. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.